# लेडीज् सायकल

दोन अंकी नाटक

**प्रल्हाद जाधव**

भूमिका :
प्रभा सरदेसाई  (४० वर्षे)

(पडदा उघडतो. मुंबईतील माहिम-माटुंग्यासारख्या गजबजलेल्या भागातील एका मध्यमवर्गीय हौसिंग सोसायटीतील इमारत. पहिल्या माळ्यावरचा लहानसा फ्लॅट. अतिशय सुंदर आणि कलात्मक इंटेरिअर. हॉल आणि किचन एकत्र. किचनचा ओटा, भांड्यांची मांडणी, डायनिंग टेबल. छोटा सोफा कम् बेड. टेबल-खुर्ची, भिंतीला लागून शोकेस, त्यात पुस्तके, टीव्ही, रेडिओ. भिंतीवर छान पेंटिंग,घड्याळ, कॅलेंडर, आरसा. नजरेत भरणारा छोटा देव्हारा. देव्हाऱ्यात बासरी वाजविणाऱ्या श्रीकृष्णाची मूर्ती. एकीकडे मुख्य दरवाजा. किचनच्या खिडकीतून खाली डोकावून पाहता येते. खाली मोकळी जागा - म्हणजे चौक. तिकडे मुले खेळत असतात. रहिवाशांची, फेरीवाल्यांची ये-जा सुरू असते. वरून थोडे ओरडले की आवाज खाली पोहोचू शकतो. खालचा आवाज वर येतो.

बाहेरून प्रभा येते. टिपीकल मध्यमवर्गीय कमावती स्त्री. वय ४०च्या आसपास. देखणी, हसतमुख. (पण सुट्टीच्या दिवशी बाहेर पडावे लागेल म्हणून त्रासलेली) हातात खरेदीच्या पिशव्या. हाशहुश करत घाम पुसते, पाणी पिते, एका पिशवीतून पानात बांधलेला मोगऱ्याचा गजरा काढून श्रीकृष्णाला वाहून नमस्कार करते, मग पिशवीतून एकेक वस्तू बाहेर काढत त्या त्या ठिकाणी लावत बोलू लागते. – स्वत:शी, हळूहळू प्रेक्षकांशी...)

: नको तो बाईचा जन्म असं वाटतं अगदी. रांधा, वाढा, उष्टी काढा, मुलं सांभाळा आणि वर नोकरी करा. आणि त्यातही सुटीचा दिवस म्हटलं की बघायलाच नको. नेहमीच्या दुप्पट कामं. दुसऱ्याच्या हातची कामं पसंत पडत नाहीत म्हणून स्वत:च सारंकाही करण्याचा हट्ट. प्रत्येक गोष्ट बिनचूक असावी, जागच्या जागी असावी असा आपला स्वभाव, पण त्रास किती होतो त्यामुळं ! कशासाठी करायचा जीवाचा इतका आटापिटा? कुणासाठी? नोकरीतसुद्धा असंच राब राब राबायचं, कर्तृत्व गाजवूनही चेष्टेचा विषय व्हायचं, स्टाफच्या संशयी नजरा झेलायच्या, कुत्सीत बोलणी ऐकायची. कारस्थानी कारवाया करणाऱ्यांच्या कंपूत सामील तरी व्हायचं नाहीतर त्यांचा विरोध तरी ओढवून घ्यायचा, दुसरा काही ऑप्शनच नाही.

बंड करून उठावसं वाटतं पण... हा ‘पण’ आलाच मध्ये. (प्रेक्षकांकडे पाहात) या ‘पण’नं आयुष्यातील अनेक स्वप्नांना कात्री लावलीय, अनेक इच्छा दडपून टाकल्यायेत, अनेक मनसुबे धुळीला मिळवून टाकलेयत. हा ‘पण’ आधी आयुष्याच्या डिक्शनरीतून नाहीसा करून टाकला पाहिजे... त्या पाठोपाठ हे कॅलेंडर, त्यातले हे सुट्ट्यांचे लाल चौकोन... काय उपयोग आहे त्यांचा? फक्त कॅलेंडरमध्येच शोभून दिसतात ते. सुट्टी आली की त्याच दिवशी सगळी पेंडिंग कामं घेणेकऱ्यासारखी समोर येऊन उभी राहतात. नाहीतर अर्जंट कामासाठी ऑफिसमध्ये तरी जावं लागतं. नाही म्हणायची सोय नाही, कारण नोकरी ही आपली गरज. मग काय उपयोग आहे या साऱ्याचा? हे घड्याळ... ठरल्यावेळी त्यातला गजराचा राक्षस जागा होतो आणि ठणाणा बोंबलत आपला दिवस ताब्यात घेतो, इकडून तिकडं पळायला लावतो, क्षणाची उसंत मिळू देत नाही. जणू काही आपण त्याचे गुलाम आहोत! जगातली सगळी घड्याळं नष्ट करून टाकली पाहिजेत. घड्याळं, कॅलेंडरं, दिवस-वार, काळ वेळ... या साऱ्याच्या पलिकडं जाऊन निवांतपणानं, समाधानानं, आनंदानं जगण्याचा काही मार्ग शोधून काढता आला पाहिजे. आयुष्याची सारी कॅसेट रिवाईंड करून पुन्हा नव्यानं जगण्याची संधी मिळायला पाहिजे... (संगीत सुरू होतं. आता ती आपली प्रतिक्रिया गद्यमय गाण्याच्या रूपात देऊ लागते.)

: एखादा जादूचा दिवा हाती असता
तर किती बरं झालं असतं!
दुसऱ्यांना नुसते हुकुम सोडत, मज्जा मारत
अगदी आपल्या मनासारखं
आरामात जगता आलं असतं!

फार नाहीत आशा अपेक्षा, फार नाहीत स्वप्नं
एवढंच वाटतं की,
वेळच्या वेळी व्हाव्यात गोष्टी, वाचावेत कष्ट.
जेवून झाल्यावर आपोआप व्हावीत
घासून भांडी,
आणि सारखं सारखं होऊ नये ओलं
बाळाचं दुपटं!

कामावरनं दमून आल्यावर
चहा मिळावा आलं घातलेला,
धुतले जाऊन आपोआप व्हावी इस्त्री कपड्यांना
मटार मिळावा सोलून आणि खुडून मिळावी मेथी
आणि जन्मभर टिकून राहावी जुळून आलेली नाती!

साहेब असावे खुषीत नेहमी,
पगारात व्हावी दर महिन्याला वाढ,
कुजकट शेरे मारणारांची व्हावी फजिती
आणि उघड पडावी त्यांची कारस्थानी चाल!

पंखावरती आभाळ तोलत,
फिरून यावं मस्त
आनंदाच्या झोक्यावरती
झुलत बसावं नुसतं...

नको बाईचा जन्म म्हणोनी पुरूष व्हावंसं वाटतं,
पण रोज रोज दाढी करण्याचेही नको पडायला कष्ट.
डिलीव्हरी व्हावी पण; होम डिलीव्हरी...
मुलगा-मुलगी जे पाहिजे ते लगेच मिळावं–
रेडिमेड आणि स्वस्त!

पाठ टेकताच यावी झोप
अन पडावीत सुंदर स्वप्नं.
परिराणीने चेपत पाय
सांगावी ‘हॅपी एण्डिंग’ची गोष्ट.
दौडत यावा घोड्यावरूनी राजपूत्र अन त्याने–
त्याने आपल्याला अलगद उचलून,

पळवून न्यावे चक्क!

दु:ख नसावं, कष्ट नसावेत,
टेन्शन नसावं मरणाचं
बटण रिमोटचं हाती असावं
रोजच्या रिॲलिटी शोचं...
भूत, भविष्य अन् वर्तमानही
मुठीत असावा ऐसा–
काळाची कॅसेट रिवाईंड करून
नव्यानं जगावंसं वाटतं!

असा जादूचा दिवा एखादा
हाती असता तर
किती बरं झालं असतं!
दुसऱ्यांना नुसते हुकुम सोडत, मज्जा मारत
अगदी आपल्या मनासारखं
आरामात जगता आलं असतं!

(बोलता बोलता अचानक तिच्या पोटात कळ येते. किंचाळत, कळवळत ती खुर्चीत जाऊन पडते आणि डॉक्टरांना फोन करते. "हॅलोऽऽऽ हॅलोऽऽऽ हॅलो, डॉक्टर प्रकाश? नमस्कार म..मी...मी प्रभा बोलतेय...प्रभा सरदेसाई...काही नाही पोटात कळ आली आणि..." पुढचं काही ऐकू येत नाही. फक्त तिच्या हालचाली आणि हातवारे दिसतात. प्रकाश बदलतो. ॲम्ब्युलन्सच्या सायरनचा पुसटसा आवाज. पूर्ण अंधार.)

(काही क्षणांनी प्रकाश. प्रभा आहे तिथेच–तशीच बसलेली. हळूहळू उठते. 'अयाईऽऽऽग' करत पुन्हा बसते. जणू पोट दुखतंय हे ती क्षणभर विसरली होती. काही क्षणांनी पुन्हा उठते. तांब्यातील पाणी पेल्यात ओतून एक घोट घेते. पुन्हा प्रेक्षकांशी बोलू लागते. )

: साधं पोट दुखायला लागलं म्हणून डॉक्टरांकडे गेले. डॉ.प्रकाश तपस्वी–आमचे फॅमिली डॉक्टर. तर त्यांनी काय करावं? डायरेक्ट उचलून टाटाला नेली. तिथले डायरेक्टर– डॉक्टर वासुदेवन् त्यांचे मित्र. दोघेही एकत्र शिकलेले, एकाच हॉस्टेलला राहिलेले. त्यांच्यासमोरच सगळ्या टेस्ट करून घेतल्या, कंप्युटरवर रिपोर्ट बघितले आणि लगेच ऑपरेशन टेबलवर घेतलं... काय काय काढलं पोटातून बाहेर परमेश्वराला ठावूक... आठ-दहा दिवसात रिपोर्टस येतील, मग बघू म्हणाले! कुणाशी काही बोलायची फुरसतसुद्धा मिळू दिली नाही, प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे म्हणाले. पण ज्या घाईत त्यांनी हे सर्व केलं ते लक्षात घेता 'काहीतरी गडबड आहे हे लक्षात आलं! आणि आजवरचा अनुभव लक्षात घेता आयुष्य काही आपल्यासाठी एखादं छान सरप्राईज घेऊन येईल हे शक्यच वाटत नाही मला. इन फॅक्ट, इट्स बेटर टू प्रीपेअर फॉर द वर्स्ट... (संगीत सुरू होते. जणू ती निराशेच्या गर्तेत ओढली जात आहे.)

संपलं सारं! उतरण्याचं ठिकाण आलं! इतक्या लवकर येईल ते, असं वाटलं नव्हतं. अजून खिडकीजवळची जागासुद्धा मिळाली नव्हती. तेवढ्यात कंडक्टर आला, त्यानं घंटा मारली आणि खाली उतरायला भाग पाडलं. (टिंग् ऽऽऽ असा एस.टी.ची घंटा

वाजल्याचा आवाज. त्या काल्पनिक कंडक्टरला उद्देशून) का हो कंडक्टरसाहेब, अगदी विचार करायलासुद्धा वेळ दिला नाही तुम्ही. काय वाकडं केलं होतं मी तुमचं? काय देणं लागत होते? कशाला थांबवलीत गाडी अशी मध्येच एकाएकी आणि उतरवलंत खाली?  फुकट नव्हती बसले मी , रांगेत उभं राहून रितसर तिकीट काढलं होतं, कष्टाचे पैसे मोजले होते. आणि किती सुंदर स्वप्नं बघितली होती मी या प्रवासाची! थंडगार वाऱ्याच्या झुळुका अंगावर घेत छान तंद्री लागावी, मध्येच एखादी डुलकी काढावी, चांदण्याच्या प्रकाशात फुलांच्या स्टेशनात उतरावं, त्या फुलांत लोळावं, तिथलं चांदणं मनसोक्तपणे पिऊन पुन्हा प्रवास सुरू ठेवावा असं ठरवलं होतं... पण तुम्ही बेल मारलीत आणि ड्रायव्हरनं गाडी थांबवली.

काय घाई होती इतकी? जाने दो, तुमची साक्ष काढून काही फायदा नाही आता. त्यापेक्षा पसारा आवरायला घ्यावा सगळा. (एकेक वस्तू आवरायला घेत बोलू लागते.) कितीही आवरलं तरी पसारा होणं काही थांबत नाही. कागदपत्रं, कपडेलत्ते, फर्निचर, भांडीकुंडी. पसारा नाही तर दुसरं काय? आणि आपण नसल्यावर तर काय अर्थ उरणार आहे या साऱ्याला? भंगारात जाणार सगळं... आणि बाहेर जसा हा पसारा पडलाय तसाच आत, मनातही पसारा झालाय भावभावनांचा, नातेसंबंधांचा, देण्या-घेण्याचा, अस्ताव्यस्त, गुंतागुंतीचा. 'पिसारा' म्हणूया फारतर. आपणच फुलवला होता तो. आपणच नाचत होतो वेड्यासारखं. काय करायचं आता? दुसरं काय? आपणच सफाई करायची त्याची, मनाची पाटी कोरी करून टाकायची, मग मिटून घ्यायचं स्वत:ला आतल्याआत आणि संपवायचा सारा खेळ.

पण सोपं आहे का ते एवढं? जमेल का ते आपल्याला ? इथल्या प्रत्येक वस्तूशी, प्रत्येक अनुभवाशी घट्टपणे जोडले गेलोय आपण, जखडलोय, प्रत्येक क्षणात गुंतलोय. पाण्यात रंग मिसळावा तसं जीवनाशी एकरूप झालोय... मग कसं वेगळं काढता येईल स्वत:ला स्वत:पासून? कशी स्वत:ची सावली अंगावेगळी करता येईल? कशी मनाची पाटी कोरी करता येईल? पण कितीही अवघड वाटलं तरी सारा खेळ आवरून ठेवला पाहिजे आता. मन घट्ट करून, काळजावर दगड ठेवून. लहानपणी नाही का आई ओरडायला लागली की भातुकलीचा खेळ आवरून ठेवायचो आपण; तसंच समजायचं ! खेळच होता हा एक प्रकारचा... एकेक पाकळी आत ओढून घेत आयुष्याचं कमळ हळुवारपणे मिटून घ्यायचं. पाकळीगणिक एकेक आठवण आत गुंडाळत न्यायची, आतल्या आत कोंडून टाकायची. श्वाससुद्धा हलके हलके थांबवायचा. त्याचा शेवटचा हलकासा स्पर्श जाणिवेच्या टप्प्यात आला की तिथंच थांबायचं. नेटानं, प्राणपणानं. थोडी तडफड, थोडी घुसमट, पेशी-पेशींचा जीवघेणा आकांत आणि मग एक थंडगार पूर्णविराम !(मोबाईल वाजतो. ती घेते. नंबर पाहते. फोन डॉक्टरांचा.)

नमस्कार डॉक्टरसाहेब! आले का रिपोर्ट? काय म्हणता? (शांतपणे ऐकून घेत) तुम्ही काही काळजी करु नका, आयॅम प्रिपेअर्ड फॉर द वर्स्ट, कोणती स्टेज आहे? बोला स्पष्ट बोला. मला काही धक्काबिक्का बसणार नाही. प्रत्येकाला मरायचंय आहे एक ना एक दिवस! (ऐकत) बरं... बरं... बरं... बरं... पुढं काय करायचं आता? सेकंड ओपीनियन? (खिन्न) काय फरक पडणार आहे त्यामुळे? ऑफकोर्स आय मीन इट! वाईट बातम्या नेहेमी खऱ्या होतात डॉक्टरसाहेब. फार तर आजाराची ग्रेड थोडी कमी-जास्त होईल इतकंच! यंत्र कधी खोटं बोलत नाहीत, माणसांसारखी. त्यांना भावना नसतात. शिवाय यंत्र जितकं नवं आणि आधुनिक तितकी निदानाची खात्री! त्यातून भारतातच नाही तर जगभर लौकिक आहे टाटाचा.  (संगीत) काय? अनेक प्रश्नांची उत्तरं अजून दिलेली नाहीत विज्ञानानं? प्रत्येक केस वेगळी असते? चमत्कार? (निराश हसत) छे छे डॉक्टर, प्लीज... माझी समजूत काढण्याचा प्रयत्न करू नका. लेट्स ॲक्सेप्ट द फॅक्ट्स. सेकंड ओपीनियन घेऊन पैसा आणि वेळ खर्च करण्याची इच्छा नाही माझी. नकोच तो मन:स्ताप. फक्त पुढं काय करायचं तेवढं सांगा म्हणजे झालं, माझा पूर्ण विश्वास आहे तुमच्यावर...

(ऐकत) केमोथेरेपी सुरू करायची? ओके! ओके... किती दिवस चालेल ट्रीटमेंट? वर्षभर? सहा सायकल्स? ओके, ओके... पण या ट्रीटमेंटनंतर तरी पूर्ण बरी होईन ना मी? जगण्याचे चान्सेस किती? फिप्टी फिप्टी, फॉर्टी सिक्स्टी की एटी ट्वेंटी? की संपलंय आधीच सारंकाही? गप्प का बसलात बोला, स्पष्टपणे बोला डॉक्टर. (ऐकत) ठीक आहे... ओके, ओके, चालेल. डॉक्टर वासुदेवन् यांच्याशी बोला तुम्ही. होते मी अॅडमिट. थँक्यू. थँक्यू डॉक्टर. (फोन ठेवते. संगीत. हताश. गर्भगळीत. प्रेक्षकांना) ओव्हरियन अॅण्ड अॅक्युट पेरिटोनियल कॅन्सर. स्टेज थ्री. डॉक्टर वासुदेवन् यांचा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघ!

केमोथेरेपीच्या सहा सायकल्स. प्रत्येक सायकलीनंतर एक्स-रे, सीटी स्कॅन, टुडी इको, एमआरआय, सीबीसी, एलएफटी-आरएफटी, मणक्यातलं इंजेक्शन, पुन्हा नवनव्या चाचण्या, नवनवे अंदाज, नवनवी औषधं.
बाहेरचं काही खायचं नाही, गर्दीच्या ठिकाणी जायचं नाही, टेन्शन घ्यायचं नाही, निगेटिव्ह विचार करायचा नाही. वर पुन्हा डॉक्टरांच्या सावध प्रतिक्रिया! बघू, प्रयत्न करू, लेट्स ट्राय, वेट अॅन्ड वॉच...(स्वत:शी) एकूण काय मॅडम, तुमचं काही खरं नाही आता, नशिबावर हवाला ठेवून पुढचे दिवस काढा...

(देव्हाऱ्यातील कृष्णाकडे पाहात) आयुष्यात कधी तुझी पूजा चुकवली नाही. नेमानं उपासतापास केले. व्रतवैकल्यं केली. जन्माष्टमीला तुझा पाळणा हलवला, सुंठवडा वाटला, पण एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं, भरल्या ताटावरून उठावं लागलं. भक्तांच्या मदतीला धावून जाण्याचे तुझे खूप किस्से ऐकले होते. पण मला काही मदत कराविशी वाटलं नाही तुला. माझ्या मदतीसाठी काही धावून यावसं वाटलं नाही तुला. काय पाप केलं होतं म्हणून माझ्या नशिबी आलं रे हे?

(प्रेक्षकांना) कॅन्सरनं हल्ल्यासाठी ठिकाण निवडलं ते सुद्धा अगदी मोक्याचं. गर्भाशय. निर्मितीप्रेरणेचा पहिला हुंकार जेथून प्रतिध्वनित होतो असं मुलायम गर्भागार. नव्या सृष्टीच्या निर्माणाची आशा जेथे अंकुरते, पल्लवित होते आणि विस्तारत साऱ्या विश्वाला कवेत घेते अशी मायावी भूमी—सृजनाचं महाद्वार... चौकातल्या गुंडांच्या टाईमपास हाणामाऱ्यांपासून राजेरजवाड्यांच्या दीर्घकालीन लढायांचं वैश्विक कारण, कोटी सूर्यांच्या निर्मितीचं प्रबळ तेज धारण करण्याची शक्ती असलेली सुकुमार ओंजळ आणि पुरूषी मस्तीला नको झालेली पोरं पाडण्याची एक स्वस्त पिशवी! माणसाच्या आदी-अंताचा थांगपत्ता लागू न देणारं एक सनातन कृष्णविवर—ब्लॅक होल ! (भ्रमिष्टासारखी हसते)

शरीरशास्त्राच्या विषयात सरांनी शिकवलं होतं गर्भाशयाचं कार्य... आकृती काढून दाखवली होती. उलटा पेरू. फळसुद्धा किती नामी. पोपटाला आवडणारं, टोकरून टोकरून खाल्लं जाणारं. पाचक. तिखट-मीठ लावून खाल्यास अधिक स्वादिष्ट होणारं... निर्मितीच्या निर्मळ झऱ्याचं संगीत काळजाशी जपणारा आणि सहस्त्रकांच्या पाझरात जगाला बुडवून नष्ट करण्याची क्षमता असणारा एवढासा पेरू. माणसाच्या एकूणच ज्ञात इतिहासाचा जवळचा साक्षीदार, आय विटनेस ! साडेचार हजार कोटी वर्षांच्या या अंधाऱ्या भुयारातून उत्क्रांत होत गेलं माणूस नावाचं एक श्वापद. शब्दात बांधता न येणारं, कोणत्याही व्याख्येत न बसणारं, अज्ञात आकाशगंगांना गवसणी घालू पाहणारं आणि वेळोवेळी स्खलनाच्या चिखलात रुतून पुन: पुन्हा आत्मघात करत राहणारं !

ऑपरेशन थियेटरच्या मंद प्रकाशात निर्विकारपणे खुडला गेला माझा लाडका पेरू! आणि प्लॅस्टिकच्या काळ्या पिशवीतून वॉर्डबॉयच्या खांद्यावरून कचऱ्याच्या गाडीतून जाऊन पडला कोणत्या तरी बेवारस डंम्पिंग ग्राऊंडमध्ये!
(एवढा वेळ सावरून धरलेलं तिचं अवसान सुटतं. लहान मुलीसारखी हमसून हमसून रडू लागते. काही क्षणांनी शांतता. आता ती सावरलेली. झप्पऽऽऽ असा गूढ आवाज एका बाजूनं येतो आणि दुसरीकडे निघून जातो. तो आवाज म्हणजे जणू कॅन्सरचे

एक भयावह श्राव्यरूप! हा आवाज म्हणजे नाटकातील एक पात्रच. ते अधुनमधून येत जात राहतं, त्याच्याशी तिचं बोलणं होत राहातं. पुन्हा तो आवाज येतो. त्या दिशेनं पाहात बोलू लागते...)

: का रे बाबा गाठलंस मला असं खिंडीत? काय गुन्हा केला होता मी  तुझा? काय घोडं मारलं होतं तुझं? आयुष्यभर नाकासमोर चालत आले. अभ्यास केला, परीक्षा दिल्या, प्रामाणिकपणे नोकरी करत राहिले, कधी कुणाचं खोटं खपवून घेतलं नाही. कुणाचं वाईट केलं नाही. नितीमत्तेची चाड राखली, मूल्यांचं रक्षण केलं. स्वत:ला जपलं आतुन-बाहेरून. साधं पानसुद्धा खाल्लं नाही कधी. पण मध्येच कुठून आलास तू आत आणि लावलीस कीड? कधी पोखरायला सुरूवात केलीस शरीर याचा पत्तासुद्धा लागू दिला नाहीस. काय साधलंस मला असं भरल्या ताटावरून उठवून? कोणत्या जन्मीचा दावा साधलास?

(पुन्हा तो आवाज तिच्यासमोरून एकीकडून दुसरीकडे गेलेला. त्या दिशेने पाहात) तू काय उत्तर देणार म्हणा ! आणि बोलायला तोंड तरी कुठाय तुला? रस्ता सरळ असला तरी तिरक्या पायानं चालणारा खेकडा तू! येताना चोरपावलांनी येणार आणि बाहेर पडताना मात्र मोठा गाजावाजा करत जाणार! एखाद्याची मनस्थिती, भावभावना यांचा विचार करणं जीवनमूल्यांत बसतच नाही तुझ्या. तुला कसल्या आल्यायत म्हणा भावभावना आणि जीवनमूल्यं? भरल्या ताटावरून माणसाला उचलायचं एवढंच तुला माहीत. म्हाताऱ्या-कोताऱ्यांचं सोड पण लहान लहान मुलांना उचलतानाही तुझं काळीज कधी हलताना दिसलं नाही. ‘पाषाणहृदयी’ हा शब्द अगदी चपखल आहे तुझं वर्णन करण्यासाठी. अगदी दगडासारखं हृदय तुझं, त्यात कसली आलीत स्पंदनं नि ओलावा? तुझ्याशी बोलायचं म्हणजे भिंतीवर डोकं आपटून घेण्यासारखं आहे, आणि ऐकून घेण्यासाठी कान असावे लागतात, ते तरी कुठायत तुला?

(उठते आणि डॉक्टरांना फोन लावू लागते. फोनवर) नमस्कार डॉक्टर, प्रभा बोलतेय... (थोडं थांबून) मला एवढंच सांगा, मी काय कुणाचं वाकडं केलं होतं म्हणून हा कॅन्सर झाला मला?
डॉक्टर : (पुढे त्यांचा फक्त आवाज) त्याची कारणं समजली असती तर ती शोधून काढून तो नाहीसा केला नसता माणसानं? आणि एक लक्षात घे  प्रभा, कुणाचं काही वाकडं करणं किंवा न करणं, पाप-पुण्य, गरीब-श्रीमंत, यश-अपयश याच्याशी काहीही संबंध नसतो त्याचा.
प्रभा : पण काहीतरी लक्षणं दिसत असतील ना त्याची? डॉक्टर आहात तुम्ही!
डॉक्टर : माझ्यावर अविश्वास दाखवतेस का तू?
प्रभा : सॉरी, तसं म्हणायचं नव्हतं मला.
डॉक्टर : (हसत) अशा अनेक केसेस बघितल्यात मी की एकही लक्षणं नसताना तिथं कॅन्सर झाल्याचं आढळून आलं आणि अशाही अनेक केसेस बघितल्यात की लक्षणं आढळून आलेली असतानाही तिथं तो झालेला नाही!
प्रभा : (निरूत्तर)
डॉक्टर : ट्राय टू अण्डरस्टँड मी. केस उगाच पांढरे झालेले नाहीत माझे. जग पाहिलंय मी...आणि महत्त्वाचं म्हणजे डॉक्टर आहे मी तुझा. आय नो व्हॉट इज बेस्ट फॉर यू...
प्रभा : आय ॲम रियली सॉरी डॉक्टर!
डॉक्टर : आपल्याकडे वेळ नव्हता. आय ट्राईड माय लेव्हल बेस्ट. पण डॉक्टर वासुदेवन् ऐकायला तयार नव्हते– एनिशिअली इट ॲपिअर्ड टू बी ॲन एण्डोमेट्रिअल हायपरप्लासिया बट इट हॅड ऑलरेडी डेव्हलप्ड इनटू थर्ड स्टेज (शांतता) ब्लड, पेल्वीस, अल्ट्रासाऊंड, साऱ्या टेस्ट केल्या, बायप्सी केल्यावर तर शंकेला जागाच राहिली नाही, मग निर्णय घ्यावाच लागला ! (शांतता)
प्रभा (एकदम उन्मळून पडल्यासारखी रडू लागते)

डॉक्टर : शांत हो प्रभा, शांत हो. बी पेशंट. काम डाऊन. अजून बराच पल्ला गाठायचाय आपल्याला. महत्त्वाचं म्हणजे या सगळ्या ट्रीटमेंटमध्ये तुला तुझा आत्मविश्वास टिकवून ठेवावा लागणार आहे, मोराल हाय ठेवावं लागणार आहे. आणि डॉक्टरांवर विश्वास ठेवणं हे सर्वांत महत्त्वाचं.
प्रभा : हो बरोबर!
डॉक्टर : ते सांगतील  तेवढं ऐकायचं. ते ट्रीटमेंट ठरवतील, त्याप्रमाणं पुढं जायचं. प्रत्येक सायकलीनंतर काही दिवस विश्रांती, पुन्हा नवीन सायकल. केमोथेरेपीमुळे कॅन्सरच्या सेल्सबरोबर चांगल्या सेल्सही  मरतील, त्यामुळे इतर अनेक प्रश्न निर्माण होतील पण काळजी करू नको. अनेक  औषधं उपलब्ध आहेत आता बाजारात. ब्लडसेल्स नव्यानं निर्माण करणारी औषधही आलीत हे लक्षात घे.
प्रभा : (शांतपणे ऐकतेय)
डॉक्टर : डॉक्टर वासुदेवन् म्हणालेत त्याप्रमाणं पहिल्या सायकलीनंतर आपण ब्लड, एक्सरे, सीटी स्कॅन, एम. आर. आय. साऱ्या टेस्ट करू. कॅन्सर किती कंट्रोलमध्ये आहे, अन्य कुठे पसरलेला तर नाही ना याची खात्री करून घेऊ आणि पुढची ट्रीटमेंट ठरवू. गरज भासल्यास रेडिएशन घेऊ. इज दॅट ओके?
प्रभा : किती सहजपणे बोलताय डॉक्टर तुम्ही, पण मला झेपणार आहे का हे सारं? तुम्हाला माहिताय ना मी एकटी कशी जगतेय ती! निदान तुमचा आधार असायला हवा.
डॉक्टर : निरंजनशी बोलायचं ठरवलंय मी...
प्रभा : (उसळत) प्लीज डॉक्टर, नाव काढू नका त्याचं. तोंडही पाहायचं नाही मला त्याचं. त्याच्या मदतीपेक्षा माझं मी करायला समर्थ आहे, तुम्ही मसोबत असायला हवं एवढीच अपेक्षा आहे माझी.
डॉक्टर :  म्हणून तर करतोय ना हे सर्व? ॲन्ड लिसन– डॉक्टर वासुदेवन इज अ वर्ल्ड नोन गायनाकॉलॉजिक ऑंकॉलॉजिस्ट. ही विल टेक केअर ऑफ एवरीथिंग. मी बोललोय त्यांच्याशी. त्यांना की सांगितलंय, पेशंट इज व्हेरी ब्रेव्ह ॲन्ड को-ऑपरेटिव्ह. त्यांची हेल्थकेअर टीमसुद्धा एक्सलंट आहे. ते लोक ट्रीटमेंटविषयी,खाण्यापिण्याविषयी, साईडइफेक्टविषयी सर्व समजावून सांगतील, ओके?
प्रभा : (ती शांत. निरूत्तर. नि:शब्द)
डॉक्टर : त्यांची ऑंकॉलॉजी स्पेशालिस्ट नर्स, डाएटिशियन, सोशल वर्कर्स सगळे मदत करतील. कौन्सेलर्स विल टेक केअर ऑफ युवर इमोशनल कन्सर्नस्... ॲन्ड येस, मी आहेच काही लागलं तर. काही विचारायचंय अजून?
प्रभा : बरंच काही!
डॉक्टर : आपण सारं करू, माझी ओपीडी झाली की बोलतो मी तुझ्याशी सविस्तर. टेक केअर, बाऽऽय.

(फोन ठेवते. संगीत. आरशासमोर येऊन उभी राहते. केसांचा आंबाडा सोडते. लांबलचक, काळेशार, मुलायम केस मोकळे होतात. त्यांवरून कंगवा फिरवू लागते.)
: जन्माला आले तेव्हाच भरपूर जावळ होतं माझ्या डोक्यावर. आणि नंतर केस इतक्या झपाट्यानं वाढू लागले की सगळ्यांना त्याचं आश्चर्य वाटायचं. शाळेत सगळ्या मुली माझा हेवा करायच्या. आई नियमितपणे केसांना तेल लावायची, शिकेकाईनं मस्त धुऊन द्यायची... (केस विंचरत असतानाचा आईचा आवाज)

आईचा आवाज : किती हलवतेस ग डोकं? जरा शांत बस की! शिकेकाईनं कसे मऊ झालेत बघ केस. आणि लांब किती झालेत बघ, अगदी टाचेवर पडतायत! झालं थांब– अगं, झालं झालं! स्वच्छ पुसून देते मग अंगणात जाऊन वाळवत बस! आणि हो तिकडनं सोनेरी केसांचा एखादा राजकुमार पांढऱ्या घोड्यावरून आला आणि तुला अलगद उचलून घेऊन गेला तर आम्हाला विसरू नकोस कधी! काय? (दोघींच्या हसण्याचा आवाज. अंधार.)

(प्रकाश. संगीत काही किरकोळ फेरबदलांसह हॉलची आता हॉस्पिटलमधील खोली झालेली. प्रभा कॉटवर. पाठीमागे उशी घेऊन अर्धवट उठलेल्या स्थितीत, प्रेक्षकांना सन्मुख, हॉस्पिटलच्या निळ्या गणवेशात. बाजूला सलाईनचा स्टॅण्ड आणि त्याला लटकवलेली बाटली. सलाईन सुरू आहे. सलाईनच्या बाटलीकडे ती निरखून पाहात आहे. नेहेमीप्रमाणे बोलू लागते. स्वत:शी, मग हळूहळू प्रेक्षकांशी–)

: डॉक्टर वासुदेवन् नुकतेच येऊन गेलेत. सिस्टरला साऱ्या इन्स्ट्रक्शन्स दिल्यात त्यांनी... एक शब्द जास्त नाही, एक कमी नाही. फार हिशेबी माणूस! डॉक्टरनं असंच असायला हवं... पण वाटलं अजून बोलायला हवं होतं आपल्याशी त्यांनी. विचारपूस करायला हवी होती. जाने दो... जिथं आपलीच माणसं परकी होतात तिथं परक्या माणसांकडून आपलेपणाची अपेक्षा काय धरायची! ... सलाईनचा एकेक थेंब टपकतोय. नळीतून खाली खाली सरकत मनगटावरच्या शिरेतून शरीरात येतोय. सलाइनमधलं औषध– रक्तवाहिन्यातून शरीरभर पाझरत चाललंय. डोक्याच्या केसांपासून पायांच्या नखांपर्यंत. अंगांगात, फुप्फुसात, यकृतात, हाडांच्या पोकळीत, शरीराच्या ज्या ज्या भागात कॅन्सर पसरलाय तिथवर जाणार आहे ते. तिथल्या रोगजंतूंना शोधून त्यांना नष्ट करणार आहे ते!

एक डोस शरीरात जायला पाच ते सहा तास लागणार आहेत. अशा पाच दिवसांची एक सायकल. दर तीन आठवड्यांनी पाच दिवस- अशा सहा सायकली! बापरे! किती मोठा पल्ला गाठायचाय आपल्याला...

रक्तातील पांढऱ्या पेशी पुरेशा प्रमाणात वाढल्या नाहीत तर पुढची सायकल होणार नाही, तोवर थांबावं लागणार, म्हणजे ट्रीटमेंट तितकी पुढे जाणार...  म्हणजे वर्षभर हे चक्र सुरू राहणार.

औषधांच्या साईड इफेक्ट्समुळे माझी शक्ती कमी कमी होत जाणार आहे. खाण्या-पिण्यावरची वासना उडणार आहे. हळूहळू इतकी अशक्त होणार आहे मी.इतकी की  साधं  सर्दी-पडसंसुद्धा जीव घेणं ठरू शकणार आहे. म्हणूनच मला सतत डॉक्टरांच्या  देखरेखीखाली राहावं लागणार आहे.

हात अवघडलाय पण तो हलवता येत नाही. जेथून सुई आत टोचलीय ती जागा नाजूक  झालीय. पण हात हलवता येत नाही. सुई सरकली आणि सलाईन भलतीकडंच जाऊ लागलं तर त्यामुळे आणखी नवे प्रश्न निर्माण होतील. त्यामुळे हात असाच ठेवून निपचित पडून राहाणं भाग आहे. नियतीनंच आपल्याला दिलेली ही शिक्षा आहे असं समजायचं आणि निमूटपणे ती भोगायची. हाताची घडी तोंडावर बोट!

(शाळेची घंटा ऐकू येते, प्रकाश बदलतो. मुलांचा गोंधळ. प्रार्थनेचा आवाज.)

देवा तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो
सुंदर चांदण्या, चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे
सुंदर ही झाडे, सुंदर पाखरे
किती गोड बरे गाणे गाती
सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा तुझी

इतके सुंदर जग तुझे जर
किती तू सुंदर असशील...

(ती भावनावश. लहानपणीच्या आठवणींनी व्याकुळ.)
: (प्रेक्षकांना) शाळेत जाताना आई दोन वेण्या घालून द्यायची. वर रिबिनीची फुलं बांधायची. लालभडक फुलं. दोन्ही बाजूनी टोकं ओढली की रिबीन सुटायची. कुठे गाठ नाही की गुंता नाही. गंमत वाटायची. खाण्यापिण्याचे किती लाड करायची, त्याला तर हिशेबच नाही. शाळेत जाताना चिंच-गुळाच्या गोळ्या करून चॉकलेटच्या कागदात गुंडाळून द्यायची. किती अप्रूप वाटायचं त्याचं ! एकेक गोळी मी पुरवून पुरवून खायचे, मैत्रिणींना द्यायचे...

नुसत्या आठवणीनीच साऱ्या जीवनेच्छा पुन्हा पालवायला लागल्यात. आयुष्याचा पिंपळ आपल्या सहस्त्रावधी पानांच्या हातांनी लवलवायला लागलाय, खुणावायला लागलाय, साद घालायला लागलाय... आई सुगरण होती. किसलेलं खोबरं आणि गूळ घालून केलेला घडीचा घावणा ही तिची स्पेशालिटी. ती चव आयुष्यभर सोबतीस आली. तिची ती भिडाची काईल, तिला तेल लावण्यासाठी केलेलं कर्दळीच्या देठाचं सोकट आणि वरच्यावर गुळ-खोबऱ्याचं सारण घालून शेकता शेकता घडी घालत नेण्याची लडिवाळ पद्धत... सारं आठवतंय या क्षणी... कालच घडून गेल्यासारखं!

ती काईल आठवण म्हणून मुंबईला घेऊन आले मी. जीवापाड जपून ठेवली. सणासुदीला बाहेर काढली. घावणे केले. तिला नुसता हात लावला तरी आजही आईला भेटल्याचा आनंद होतो. (उत्साहाने) आई सांगायची, तिला ती काईल तिच्या आईनं म्हणजे माझ्या आजीनं दिली. तिची आठवण म्हणून! जीवापाड सांभाळायला सांगितली! पुढं तो 'वारसा' आपोआप माझ्याकडं आला. काईल कसली एका अर्थी आजीच ती!

आणि आजीसुद्धा काय ग्रेट बाई होती हो. सासर-माहेर धरून पन्नास माणसांचा संसार एकहाती  केला तिनं. त्यात गायी-म्हशी, कुत्री-कोंबडी वेगळीच! दिवसभर तिच्या हाताला खंड नसायचा. इतकं होऊनही रात्री मला कुशीत घेऊन गोष्ट ऐकवल्याशिवाय दिवस संपायचा नाही तिचा.
तिच्या हातांवरच्या रक्तवाहिन्यांच्या जाळीचा स्पर्शही अजूनही आठवतोय जसाच्या तसा. या क्षणी तो हात हातात आहे असं वाटतंय. त्या रक्तवाहिन्या मी बोटानं अशा मागेपुढे ढकलायची. ढकललेल्या जागी क्षणभर त्या थांबायच्या आणि मग पूर्ववत व्हायच्या... गंमत वाटायची.

आजी गेली आणि आयुष्यातलं एक पर्व संपलं. तिच्या  पाठोपाठ आई गेली आणि काळजाचा लचकाच कुणीतरी काढून नेल्यासारखं झालं. राहिल्या त्या फक्त आठवणी. आणि त्याही आता आपल्याबरोबरच संपणार. या आठवणींचा 'वारसा' पुढे कुणाला देण्याची संधी आपल्याला मिळाली नाही, अर्ध्यावरतीच डाव मोडला... भर मैफिलीतून उठावं लागलं. (तिला एकदम भरून येतं. हुंदका) का जन्माला घातलंस आई? का दाखवलंस हे सृष्टीचं विराट रूप? का घातलंस ह्या जीवनाच्या चरकात? का कळीचं फुल होऊ दिलंस? का या रणरणत्या वाटेवर आणून सोडलंस? का नाही जन्मण्यापूर्वीच दिलंस मानेला नख? का नाही, का नाही... का? का? का आई? सांग ना आई, सांग! (रडू लागते... गायीच्या गळ्यातील घंटांचा आवाज येऊ लागतो. आता थोडी सावरलेली पण अधिक हळवी झालेली.)

आमची एक गाय होती. फिकट तांबुस रंगाची. अबोली नाव होतं तिचं. मला शाळेतून येताना पाहिलं की आनंदानं हंबरायला लागायची. तिला मिठी मारून गळ्यातली घंटा वाजवेपर्यंत समाधान व्हायचं नाही माझं. तिला चारापाणी द्यायचे मी, आंबोण

घालायचे... तिचे टपोरे पण करूण डोळे अजून नजरेसमोर येतात. तिचं अवखळ वासरू नजरेसमोर येतं. खंडू! फार अवखळ होतं ते. कानात वारा भरल्यासारखं हुंदडत राहायचं दिवसभर. तिच्या आचळांना इतक्या जोरात ढुसण्या द्यायचं की दुधाचा एक थेंबही शिल्लक ठेवायचं नाही तिच्या पोटात...
(पुन्हा गायीच्या गळ्यातील घंटांचा आवाज, ती अधिकच हरवलेली.)

आमच्या अंगणात प्राजक्ताचं मोठं झाड होतं. चांदण्या रात्री त्याच्या फांद्यातून चांदणं असं गाळून पडायचं की अंगणात चांदण्याची फुलं पडलीत असं वाटायचं. ती फुलं वेचावीशी वाटायचं, त्यांचा सुगंध घ्यावासा वाटायचं. चांदण्याच्या फुलांना प्राजक्ताचा गंध... किती सुंदर कल्पना. एखाद्या रम्य परिकथेतलं वातावरण जिवंत होऊन सामोरं आलंय आणि आपण त्यातलं एक पात्र आहोत असं वाटायचं...

बालपण कधी संपून जातं ते कळत नाही असं म्हणतात, किती खरं आहे ते! बालपणच काय, साऱ्या आयुष्याला लागू आहे हा नियम. शाळा-कॉलेज संपून नोकरी कधी लागली, लग्न कधी झालं, मुलं कधी झाली आणि आयुष्यानं फरफटत नेणं कधी सुरू केलं काही कळलंच नाही. (संगीत)

चित्रकलेची आवड म्हणून मुंबईला येऊन बी.एफ.ए. केलं. साहित्याची आवड होती म्हणून नंतर हट्टानं बी.ए. केलं. कवितांची प्रचंड ओढ होती. केशवसूत–मर्ढेकरांपासून करंदीकर–कोलटकरांपर्यंत कितीतरी कवी झपाटल्यासारखे वाचून काढले होते. आकाशवाणी–दूरदर्शनसाठी लहान-मोठ्या स्क्रिप्ट्स लिहिता लिहिता माय-मराठी वाहिनीवर स्क्रिप्ट-रायटर म्हणून लागले. नंतर प्रोड्युसरपदी प्रमोशन मिळालं. चित्रांकडून शब्दांकडे–आयुष्याचा पतंग भरकटत गेला... कधी स्वेच्छेनं–कधी गरज म्हणून!
पुढं हे असं होणार आहे हे आधीच माहीत असतं तर कशाला केली असती ही सारी धडपड? आणि मग जन्माला तरी येण्याचा काय फायदा?

का जन्मत:च मारलं नाहीस आई? का नाही संपवलीस माझी जगण्याची परवड त्या क्षणीच? (थोडं थांबून) येतंय माझ्या लक्षात आई... माझं जन्माला येणं, माझं अस्तित्व, माझं असणं-नसणं तुझ्या नियंत्रणाबाहेरचं होतं. तू होतीस फक्त एक नदी जिच्यातून पाणी सोडण्याचं काम दुसरंच कोणीतरी करीत होतं. होतीस फक्त एक धनुष्य ज्याच्यातून बाण सोडण्याचं काम दुसरंच कुणीतरी करत होतं. होतीस एक मातीचा गोळा ज्याला आपल्या इच्छेप्रमाणं आकार देण्याचं काम दुसरंच कुणीतरी करीत होतं.

तू फक्त एक वस्तू होतीस आई, कुणाच्यातरी उपभोगासाठी तयार केलेली. एक खुंटी होतीस, कुणालाही आपल्या चुकीचं खापर पिशवीत घालून टांगता येईल अशी. एक पिशवी होतीस तू मुलं जन्माला घालण्याची, मनात येईल तेव्हा पुन्हा तयार ठेवण्याची आणि फाटून जाईपर्यंत
पुन:पुन्हा वापरण्याची. एक मुकी गाय होतीस तू आई, हवं तेव्हा दूध काढता येईल अशी. अबोली गोठ्यात होती आणि तू घरात– इतकाच फरक!

मी जन्माला आले केवळ देहधर्म म्हणून आणि तू माझं पालनपोषण केलंस ते केवळ कर्तव्यबुद्धीनं. तुझ्या आईनंसुद्धा तेच केलं. (उपरोधानं) आजोबा तिला बघायला आले तेव्हा त्यांच्याकडं न पाहता पायाच्या अंगठ्यानं जमीन उकरत राहिली ती

आणि चार चार मुलं झाली तरी तोंड बघू शकली नव्हती त्यांचं. हा किस्सा म्हणजे, बाईसाठी मिरवण्याची गोष्ट! बरोबर बोलतेय ना मी आई?

बाईनं जगायचं म्हणजे काय तर फक्त सहन करायचं. कुणाच्या तरी हुकुमांचं पालन करायचं, इच्छांना मान तुकवायची, आतल्याआत जळत राहायचं, घुसमटत राहायचं, सहन करत राहायचं. नवऱ्याला, पोरांना, आप्तेष्ट–नातेवाईकांना पाहुण्या रावळ्यांना जीवनरस पुरवण्याच्या गुंगीत, मुकाटपणाच्या कढत विसर्गात स्वत: मात्र गटांगळ्या खात राहायचं. कढत लालसर पांढरा विसर्ग–ज्याचे लोंढे कधी थांबतच नाहीत, भाजून काढतात तिचं जगणं–नासवून टाकतात. विश्व-सातत्याची एक उनाड मासोळी उसळी मारून बाहेर पडते आणि बाई उरते पुरानंतरच्या उध्वस्त किनाऱ्यांइतकी उपेक्षित!
(काही क्षण शांतता. नंतर ट्रिंग ऽऽ असा सायकलच्या घंटेचा आवाज येतो.)

(प्रेक्षकांना) लहानपणी हट्ट धरला म्हणून बाबांनी सायकल आणून दिली होती. मुलींना, वरून पाय टाकून बसता येत नाही असा समज असल्यानं कंपनीनं खास तयार केलेली, आत वळलेल्या दांडीची, खालून पाय घालून सीटवर बसता येईल अशी लेडिज सायकल! पाचवीत होते मी तेव्हा!
हाफ पॅडल मारता मारता काही दिवसांतच फुल पॅडल मारायला शिकले आणि मग वेळ मिळेल तेव्हा गावभर चकरा सुरू झाल्या. किती वेळा पडले-धडपडले, किती लागलं-खरचटलं, कितीजणांच्या अंगावर आदळले याचा हिशेब नव्हता पण डोक्यात वारं होतं, सायकलीसमोर दुसरं काहीच दिसत नव्हतं.

उन्हाळ्याच्या सुट्टीत एकदा आजारी होते. अंगभर उबाळं झाली होती. आमच्या कोकणात आंबे खूप. खा खा खाल्लेल्या आंब्यांची उष्णता बाहेर पडली होती. नाना प्रकारची औषधं झाली, पण आराम पडेना. मग आजीनं उन्हात तापवलेल्या पाण्यानं न्हाऊ घालणं सुरू केलं. तांब्याच्या कासंडीतलं ते कोमट-उबदार पाणी अंगावर घालत ती आपल्या थरथरत्या हातानं माझं अंग धुवायची. तिच्या हातांचा तो प्रेमळ, संजीवक स्पर्श जसाच्या तसा आठवतोय अजून. त्या स्पर्शानंच बरी झाले मी.

कधी कधी वाटतं – आजी बाजूलाच बसलीय आणि आपल्या पाठीवरून हात फिरवतीय... आपल्याला गोष्ट सांगतीय, खडीसाखर–मनुक्यांचा खाऊ देतीय. आपण तिच्या हातावरच्या रक्तवाहिन्यांच्या जाळ्याशी खेळतोय... तिच्या पाठंगुळी बसून 'कांऽऽऽदे बटाटेऽऽऽ' करतोय.
(हलकं संगीत) आठ दहा दिवसांनी थोडं बरं वाटलं. आराम पडू लागला. मध्येच एकदा अचानक बाहेर अंगणात येऊन बसले. सायकलवरून चक्कर मारायचा विचार मनात आला. काढली सायकल, पॅडल घुमवत दाण् कन सिटवर बसले. आणि काय सांगावं? असंख्य इंगळ्या एकाच वेळी डसाव्या तसं झालं. सायकल अंगावर घेऊन उताणी पडले आणि ठो ठो बोंबलायला लागले. आई-बाबा धावत आले, त्यांनी उचललं, नीट उभी केली, धीर दिला पण सगळा फ्रॉक रक्तानं भरलेला. कुणाला काही कळेना, नेमकं झालं तरी काय! (थांबून) मलाही कळेना–पण शेवटी लक्षात आलं, मांडीवरचं उबाळू फुटलं होतं...(हसू लागते)

(मोबाईल वाजतो. फोन घेते.)
हॅलोऽऽऽ हं बोला प्रज्ज्वल, नाही, बोला बोला – काय? साहेब बोंबलत होते? कार्यक्रम गेला नाही म्हणून? अहो पण रजेवर जाण्यापूर्वीच टेप पाठवली होती मी! एकच काय चार कार्यक्रम रेकॉर्ड करून ठेवलेयत ॲडव्हान्समध्ये. आणि सुवर्णाला विचारा की! अहो माझ्या प्रॉडक्शन असिस्टंटला माहीत नाही असं होईल? मी स्वतः समजावून सांगितलं होतं तिला. शिवाय रजिस्टर बघा, ड्युटी ऑफिसरची सही आहे त्यावर.

(ऐकत शांतपणे) नक्की काय म्हणताय तुम्ही प्रज्ज्वल? बरं... बरं... बरं... समजलं... समजलं... (हळूहळू तापत) हे तुमचं फोन करण्याचं खरं कारणं! 'माझं नाव जेण्टस टॉयलेटच्या भिंतीवर चमकलंय, माझं किरणसरांशी लफडं आहे असं लिहिलंय तिथं...' हे वाचून आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतील तुम्हाला! (थांबून) अहो, तुम्हालाच काय आपल्या सगळ्या स्टाफला ओळखून आहे मी ! आणि टॉयलेटमधलं ते दैनंदिन वार्तापत्र चालवणाऱ्या तुमच्या विकृत मंडळाचा संपादक कोण आहे ते सुद्धा माहिताय मला. तुम्हाला माहिताय ना प्रज्ज्वल हॉस्पिटलमध्ये जीवन-मरणाशी झुंज सुरू आहे माझी म्हणून? (थांबून) तरी तुम्ही या गोष्टी सांगताय मला? वैरीसुद्धा वागणार नाही एखाद्याशी असं, तुम्ही तर माझे सहकारी! (ऐकत) काय 'सॉरी सॉरी'? काय 'तसं' म्हणायचं नव्हतं? कशाला साळसूदपणाचा आव आणताय! कृपा करा आणि पुन्हा फोन करू नका! आणि तुम्हाला जर एवढी हौस असेल ना तर एक पेपरच काढा की सरळ लोकांना ब्लॅकमेलिंग करण्यासाठी!
(फोन बंद करते. काही क्षण शांतता.)

सलाईन संपत आलंय. थोड्या वेळानं नर्सला बोलवावं लागेल. मग सलाईनची दुसरी बाटली... त्यात वेगवेगळ्या औषधांचं प्रमाणबद्ध मिश्रण. डॉक्टरांनी दिलेल्या सूचना बरोबर लक्षात असतील ना नर्सच्या? आणि नर्स बदलली तर? कोणतं इंजेक्शन किती प्रमाणात घ्यायचं हे कळेल ना तिला? डॉक्टरांचं अक्षर नीट कळलं नाही तिला तर काही गडबड नाही ना होणार तिच्या हातून? जाऊदे, एकदा का त्यांच्या तावडीत सापडलो आपण की आपल्या हाती काय उरतं मग? त्या पेक्षा त्यांच्यावर विश्वास ठेवणं उत्तम, उगाच चिडचिड न करता सलाईन संपण्याची वाट बघू आणि मग नर्सला बोलवू. एकेक थेंब कसा अगदी शिस्तीनं खाली येतोय, प्रमाण अगदी ठरलेलं, कालावधी ठरलेला...

(सलाईनच्या थेंबांशी बोलू लागते)
ये-ये-ये... थांब तिथंच क्षणभर. एक हळूवार झोका घे आणि पड खाली... शाब्बास, आता नळीतून हळूहळू खाली ये आणि सुईतून या नसेत शीर...गूड...गूड...! तू आत आलास, आणि रक्तवाहिनीमधून एक लाट कशी दुखरा तरंग उमटवत शरीरभर गेली बघ! (प्रेक्षकांना) आधी त्रास झाला थोडा. नंतर सवय होत गेली, उलट गोडी लागत गेली त्याची. व्यसनच जडलं म्हणा ना एक प्रकारचं! (पुन्हा स्वत:शी) आता दुसरा थेंब... ये ये ये... एक हलकासा झोका घे... असा - असा - असा - आणि पड खाली... शाब्बास... देअर यू आर! आता तिसरा... चौथा... पाचवा... आयुष्य म्हणजे सलाईनचा एक थेंब झालंय. एवढासा चिमुकला थेंब, पण त्यातही सारं आकाश प्रतिबिंबीत होतंय. प्रत्येक थेंबातून उमलतंय आठवणींचं एकेक नवं इंद्रधनुष्य...
(संगीत)

निरंजन मला भेटला तो जे.जे.मध्ये! निरंजन–नवरा माझा. उंचापुरा, दणकट बांध्याचा. हरहुन्नरी. कॉपी-रायटिंग, इलस्ट्रेशन्स, पेंटिंग्ज्, फोटोग्राफी - सारंकाही करायचा. कविता लिहायचा, त्या उत्तम पद्धतीनं सादर करायचा. चर्चेत, वाद-विवादात, वेगवेगळ्या स्पर्धांत भाग घ्यायचा, बक्षीसं मिळवायचा. तालेवारपणे सिग्रेट ओढायचा, दारू प्यायचा, मनात आलं तर कामं सोडून पत्ते कुटत बसायचा. जगाला फाट्यावर मारण्याची त्याची बिनधास्त वृत्ती फार आवडायची मला...

एकदा मी कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये बसून चहा घेत होते, डावीकडे हाताशी वह्या-पुस्तकं. उजवीकडे पर्स होती. हाताचा कोपर असा टेबलावर ठेवून चेहेरा तळव्यावर तोलून धरला होता मी. नजर वहीत होती. उजव्या हातातला चहाचा कप ओठांजवळ आणत होते... तो क्षण नेमका पकडून त्यानं माझं चित्र काढलं आणि लगेच मला आणून दिलं. त्यानं पकडलेल्या त्या क्षणात एकाच वेळी अवघं विश्व जणू गोठलं होतं आणि प्रवाहितही होत होतं. जादू होती त्यात. संमोहित करत होतं ते मला. इतकं अप्रतिम होतं ते की मी आश्चर्यचकीत झाले. त्या एका चित्रानं घायाळ झाले, खलास झाले, माझी मी राहिलेच नाही.

त्या क्षणानं माझ्या सुसंस्कारित व्यक्तिमत्वाच्या भक्कम तटबंदीला एक भगदाड पाडलं आणि निरंजन नावाचं सुसाट पाणी त्यातून आत येऊ लागलं, आत साठू लागलं. एका अनोख्या प्रेमळ उन्मादाचं तुडुंब नीतळ पाणी. आत हेलकावणाऱ्या गवतांच्या वेली. त्यातून सुळकणारे चंदेरी मासे. काठावर तृप्तीनं ओठंगलेली झाडं, त्यावरचे निवांत बगळे, क्षितीजाशी टेकलेलं निळं आकाश, त्यात भरारणारे पक्षी, वाऱ्याचं संगीत, आणि या साऱ्या चित्राचं मनाच्या अवकाशात चमचमणारं प्रतिबिंब! त्या तुडुंब जाणिवेशी मी स्वेच्छेनं एकरूप झाले, मिसळून गेले, माझं आधीचं जग नाहीसं होऊन एक नवीनच जग जन्माला आलं! (संगीत)

... आणि मग त्या चित्रात तरंगता तरंगता बुडायला कधी लागले मी ते माझं मलाच कळलं नाही. खाली कुठंतरी एक खोल दरी होती, तिकडं ते पाणी झपाट्यानं खेचून नेऊ लागलं मला. आधी कल्पना आली नाही पण पाण्याला आतून चांगलीच ओढ होती. हळूहळू ती वाढत गेली, मी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. आरडा-ओरडा केला पण पाण्याची गती वाढतच होती. नाकातोंडात जाऊ लागलं ते. कधी तळाशी तर कधी वर, अशा गटांगळ्या खात खात एका क्षणी मी खाली कोसळले... कोसळतच राहिले... खाली आपटले तेव्हा लक्षात आलं की माझं शरीर फुटून त्याचे असंख्य तुषार हवेच्या लाटांबरोर आसमंतात विखरून गेले आहेत!

(मोबाईल वाजतो. ती घेते. फोन निरंजनचा.)

: हॅलो ऽऽऽ (थांबून) हां... बोल... बोल... (थंड कडवटपणे) न ओळखायला काय झालं? लक्षात ठेवू नयेत अशी असली तरी सहा वर्षं सोबतीनं काढलीयत आपण! काय म्हणतोस, डॉक्टरांचा फोन आला होता? स्वाभाविक आहे, वाटलं असेल त्यांना तुला कळवावं म्हणून! इतक्या वर्षांचा संबंध आहे त्यांचा आपल्या फॅमिलीशी–होता! (ऐकत) मी? मी का म्हणून कळवायला हवं होतं? काय उरलंय आता आपल्यात? (थांबून) नाहीतर काय - चीड यावी असंच बोलतोहेस तू... ओके, ओके. (थांबून) तब्बेत? ऐकून वाईट वाटेल तुला, बरी होणार आहे मी. (भेदकपणे) मी मरावं अशी इच्छा नव्हती तुझी? स्वत:लाच विचारून बघ जरा! (थांबून ऐकून घेत शांतपणे.) आता काय उपयोग त्याचा, त्याचवेळी आला असतास तर? अहंकार बाजूला सारून निर्मळ मनानं ‘सॉरी’ एवढा एकच शब्द उच्चारला असतास तर? त्यावेळी? हो त्यावेळी! आठवत नाही? नाहीच आठवणार तुला. वुई फर्गेट द थिंग्ज् वुईच वुई वॉन्ट टू फर्गेट-निरंजन! सॉरी... तुझं नाव सुद्धा घेण्याची इच्छा नव्हती पण, चुकून आलं ते तोंडात. यू वॉन्टेड टू फर्गेट मी फ्रॉम डे वन, पण तेव्हा लक्षात आलं नाही तुझं कारस्थान! आलं तेव्हा खूप उशीर झाला होता.

(थांबून ठामपणे) हे बघ, माझं मी बघून घ्यायला समर्थ आहे. कुणाच्या सहानुभूतीची किंवा सोबतीची गरज नाही मला! आणि (तिचा एकदम उद्रेक होतो.) किरणसरांचं नाव घेण्याची गरज नाही ! राहायला फ्लॅट दिला त्यांनी पण तो भाड्यानं... काही नावावर करून दिला नाही. भाडं भरतेय मी अजूनही. आमच्या चॅनलचे व्हाईस प्रेसिडेंट आहेत ते! होता त्यांच्याकडं एक अधिकचा फ्लॅट. मुंबईत अनेकांकडे असतात अशी दोन दोन घरं... आणि तो ताब्यात घेण्यापूर्वी चर्चाही झाली होती आपली. आपण नसता घेतला तर आणखी कुणीतरी घेतला असता.

आणि तुझ्या एवढं पोटात दुखत होतं तर तू का नाही घेऊन दिलास? मालकीचा काय पण भाड्याचासुद्धा मिळवू शकला नाहीस तू–अजूनही. आणि जो काही संसार झाला तो तिथंच झाला ना? शट्प, पुन्हा नाव घेऊ नकोस त्यांचं... (तिचा स्फोट होतो) आय सेड शट्प! काय नवरा नवरा करतोयस? काय सांगतोयस मला नवऱ्याचं? सगळे साले त्याच लायकीचे. सक्तीच्या संभोगांनंतर बायकोला कोणतीही ओळख न दाखवता त्रयस्थपणे सिगारेट ओढत भिंतीकडं तोंड करून झोपणारे!

गर्भपातासाठी तिला स्कूटरवरुन हॉस्पिटलपर्यंत नेऊन तिथूनच टाटा करून निर्लज्जपणे हसत कामावर निघून जाणारे... (ओरडत) हेल विथ यू !

(काही क्षण शांतता. फोन तसाच सुरू. शांतपणे.)
मी रागावलेली नाही, रागावलेली नाही मी! रागावण्याचे मुद्दे अजून आलेलेच नाहीत बोलण्यात आपल्या. आणि सेन्सिटिव्हीटीचं काय सांगतोहेस तू मला? आपलं पहिलं बाळ गेलं तेव्हा कसा वागलास तू माझ्याशी? किती कॅज्युअली घेतलीस ती गोष्ट? डोळेसुद्धा उघडले नव्हते त्यानं की श्वासही घेतला नव्हता, पण तुझ्या सो-कॉल्ड संवेदनशील मनावर त्याचा एक साधा ओरखडा सुद्धा उमटल्याचं दिसलं नाही मला  कधी–का? ती मुलगी होती म्हणून? किती क्षूद्र विचार केलास रे तू! शीऽऽऽ पण म्हटलं जाऊ दे... तू आर्टिस्ट, तुला तुझा स्पेस दिला पाहिजे, तुला समजून घेतलं पाहिजे. होईल सुधारणा तुझ्यात हळूहळू.

पण सुधारणा होणं तर दूरच उलट स्वत:च्या कोशात अधिकाधिक गुरफटत गेलास तू. माझ्या भावना, आनंद, दु:ख कधी काहीच लक्षात आलं नाही तुझ्या. (थांबून) स्तनात दूध सळसळत होतं, तो पातळ-पिवळा, संजीवक स्राव बाहेर उसळू पाहत होता, कुणाचे तरी उबदार-कोवळे, निष्पाप ओठ तिथे टेकवले जाण्याची आणि स्तनब्रह्माचं कारंजं बाहेर उसळण्याच्या क्षणाची अनिवार ओढ लागली होती मला. पण या सगळ्या भावना आतल्या आत गुदमरून गेल्या. एखादं बीज मातीतल्या मातीत करपून जावं आणि पुन्हा मातीच व्हावं तसं झालं शेवटी.

पुन्हा ज्योतीच्या बाबतीत तेच केलंस तू. तिलासुद्धा पहिल्या दिवसापासून पाण्यात पाहत होतास तू. काय त्या जीवानं घोडं मारलं होतं तुझं? ती मुलगी म्हणून जन्मली यात काय दोष होत तिचा? (थांबून) काय भलते–सलते आरोप करतेय? ज्योतीला सायकल शिकवण्याचा हट्ट कुणाचा होता, माझा? तू घेऊन गेलास तिला खाली. गेलास तो गेलास आणि तिच्यावर लक्ष ठेवायचं सोडून विद्युल्लतेला भेटायला गेलास. ती रांड अधिक महत्त्वाची वाटली तुला. सायकल चालवण्याच्या नादात ज्योती कॉलनीच्या चौकातून बाहेर पडली आणि समोरनं येणाऱ्या... (हुंदका दाबते. काही क्षणांनी शांत होते, पुन्हा बोलू लागते)

ज्योतीला जाऊन पंधरा दिवस व्हायच्या आतच मला सोडून निघून गेलास त्या छिनाल बाईकडे तू ! आधीच तुझे हे धंदे माहीत असते तर कशाला केलं असतं तुझ्याशी लग्न? तुझ्या या बाहेरख्यालीपणामुळंच आली माझ्यावर ही वेळ! कसली संवेदना तुझी रे? कसली क्रिएटिव्हिटी? कसले आर्टिस्ट आणि कसले नवरे रे तुम्ही? सगळे कोरडे उमाळे साल्यांनो तुमचे. प्रेमभंगाची टुकार गाणी ऐकत बारमध्ये दारू ढोसणाऱ्या तुमच्यासारख्या सो कॉल्ड कलावंतांपेक्षा रांडांची दलाली करणारे भडवे पत्करले. हेल विथ यू!
(फोन आपटते. त्या संतापात सलाइनचा स्टॅण्ड कोलमडून पडतो. सलाईन निघतं. ती तडफडते. यातनांनी पिळवटते... “डॉक्टरऽऽऽ, डॉक्टरऽऽऽ... आई–आई गंऽऽऽ म्हणत   डॉक्टरना–सिस्टरला हाका मारू लागते–आक्रोश करू लागते. अंधार.)
**मध्यंतर**

***

सूचना : या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, त्याचे अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यात येऊ घातलेल्या माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारणापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.
**(या नाटकाचा दुसरा अंक ज्यांना हवा असेल त्यांनी दिलेल्या पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधावा)**